महाराष्ट्र शासन

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपुर

कार्यकारी अभियंता

जिगांव उपसा सिंचन विभाग, खामगांव

दरपत्रक सुचना(दुसरी वेळ)

या विभागांअतर्गत असलेल्या उपविभागांकरीता खामगांव व अकोला मुख्यालयाकरीता एकुण ५ वाहन चालक पुरविणे करीता कंपनी/संस्था/कंत्राटदार/ यांचे कडून दि. २४.०५.२०१९ ते दि. ३०.०५.२०१९ रोजी दुपारी १४.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. प्राप्त दर पत्रके कार्यकारी अभियंता जिगांव उपसा सिंचन विभाग,खामगांव दुरध्वनी क्र. (०७२६३) २५४६०२ कार्यालयात सादर करावे. दरपत्रके दि. ३०.०५.२०१९ रोजी दुपारी १५.०० वा. शक्य झाल्यास उघडण्यात येतील. उशिरा प्राप्त दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ.क्रं | विवरण | प्रति माह/प्रत्येकी | अतिरिक्त भत्ता | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटवाहन चालक पुरविणे खामगाव अकोला करीता | सर्व करासह दर | प्रति तास | रु १०,०००/- |

अटी व शर्ती.

१) सदर सेवा ही पूर्णपणे कंत्राटी तात्पुरत्या स्वरुपाची असून नियुक्त वाहनचालकांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही.

२ ) दरपत्रके देतांना आपले दर सर्व करासह नमूद करावे. देयकाचे भुगतान करतांना देयकातून नियमाप्रमाणे आयकर/जीएसटी वजा केला जाईल.

३) करारनामा करतांना सुरक्षा ठेव म्हणून एकूण वार्षिक करारनाम्याच्या १०% रक्कम ही डिडि व्दारे जमा करावी लागेल. करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम परत करण्यात येईल.

४ ) वाहनचालक किमान दहावी /बारावी इयत्ता उत्तीर्ण व भारतीय नागरीक असावा. वाहन चालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञप्ती असेल, त्याचे ओळखपत्र त्याच्या जवळ असावे.वाहन चालकास लिहता वाचता येणे आवश्यक आहे.इंग्रजीचे किमान ज्ञान असावे. वाहनचालक गून्हेगारी पाश्वभुमीचा नसावा.

५) वाहनचालकाने कामावर असताना नशापान / धुम्रपान व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करु नये.

६) सदर करारनामा दि. १/६/२०१९ पासून अंमला येणार आहे.

७) वाहनास अपघात झाल्यास व दुर्देवाने वाहन चालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहन चालकास वैदयकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे असणार नाही. त्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.

८) कंपनी / संस्थेतर्फे काम करणा-या वाहनचालकांच्या सेवेचे कोणतेहीउत्तरदायित्व शासनावर राहणार नाही.

९) वाहनचालकाचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त आणि १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

१०) शासनाच्या आवश्यकतेनुसार वाहनचालकांचा मागणीकेला जाईल. मागणी केलेल्या कालावधीसाठी वाहनचालक उपलब्ध होवू शकत नसेल अशा वेळी पर्यायी व्यवस्था संस्था करेल. अन्यथा दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल.

Scanned by CamScanner

११) मान्यवराच्या आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त वाहनचालकास काम करणे आवश्यक राहील. कामाची वेळ ९ तासाची राहील. त्यानंतर अतिरिक्त भत्ता लागू राहील. अतिरिक्त भत्ता हा दिवसाचे ९ तासाचे काम संपल्यानंतर १ तास झाल्यानंतर म्हणजेच १० तासानंतर लागू होईल.

१२) आठवडयातुन एकदिवस साप्ताहिक सुटी असेल. तथापि त्या दिवशी काम केल्यास नियमानुसार वेतन व भत्ते देयराहील.

१३) कराराचे पालन समाधान कारक न झाल्यास करार केंव्हाही संपुष्टात आणणे, किंवा कराराची मुदत वाढविणे याबाबतचा निर्णय का.अ. जि.उ.सि.खामगांव यांचा राहील.

१४) वाहनचालकांची २ छायाचित्रे व लायसन्सची झेरॉक्स प्रत कार्यालयात जमा करण्यात यावी.

१५) कर्तव्यावर असताना वाहन चालकाची वागणूक शिष्ट संमत असेल.
उदा. वाहनचालकाने वाहतुकीचे नियम पाळणे, वागणूक सौजन्याची ठेवणे, वाहनाजवळ वाहकाने उपलब्ध असणे इ.

१६) वाहनचालकाकडे मोबाईल असावा, तथापि वाहन चालवित असतांना ते मोबाईलचा वापर करणार नाहीत.

१७) शासकीय गोपनीयता अबाधित राहील याची दक्षता वाहनचालक व संस्था घेईल.

१८) कराराचा कालावधी अकरा महीण्याचा राहील. त्यानंतर मुदतवाढ देणे अथवा कालावधी कमी करण्याचे अधिकार का.अ. यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहे.

९) शासनाच्या वाहनाची व वाहनातील ॲससरीजची काळजी / देखभाल करावी. त्यास नुकसान पोहचविल्यास संस्था जबाबदार राहील.

२०) नोंदणी शाखेने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

२१) दर करारासंबंधी कोणताही पत्रव्यवहार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचेशी करण्यात येईल.

२२) कारारा संबंधी काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.

२३) याबाबत आवश्यक नोटराईड करार १००/- रु बंधपत्रावर नियंत्रक शासकीय परिवहन सेवा यांनी सदर कंपनीसोबत तात्काळ करण्यात यावा

(श्री.वि.हजारे)
कार्यकारी अभियंता
जिगांव उपसा सिंचन विभाग
खामगांव
दि. २९/५/२०१९

जा.क्र /१५४२९ /आंड्डा

Scanned by CamScanner